# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३१/०३/२०२५ ( सोमवार ) दुपार**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## २५ लाख २५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त, १ आरोपी अटक
## उपविभागिय पोलीस अधिकारी , कन्हान यांची कामगिरी

दिनांक ३१/०३/२०२५ रोजी श्री संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधीकारी ,कन्हान हे त्यांच्या पथकासह मौदा पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, भंडारा ते नागपुर रोडवर भंडाराकडुन हायवा ट्रक क्रमाक एम. एच. ४९ बी. झेड. २६३८ या वाहनाने अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे श्री संतोष गायकवाड, उप विभागीय पोलीस अधीकारी ,कन्हान यांच्या पथकाने गोपल कंपनीजवळ पावनदौडा ओरवब्रिज येथे नाकाबंदी केली असता **हायवा ट्रक क्रमाक एम एच ४९ बी. झेड. २६३८** हे संशयीत वाहन मिळुन आले. पोलीसांनी वाहन चालकास वाहन थांबविण्याचा इशारा केला. **वाहनास** थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये रेती मिळून आली. वाहन चालक **आरोपी क्र १ नामे प्रकाश इश्वरदयाल बोपचे, वय ३४ वर्षे, रा. जयताळा रोड,निलगिरी ले आउट नागपुर ,ह.मु. दुर्गानगर, पारडी , जि. नागपुर हा मिळुन आला.** वाहन चालकाला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. मालकाचे नाव विचारले असता **आरोपी क्र २. वाहन मालक सतायु किशोर मानेकर , वय ३१ वर्षे , रा. शिवाजी चौक , जुन्या हिस्लॉप कॉलेज जवळ,गांधी गेट, महाल नागपुर, याच्या सांगण्यावरून निलज ता. मोहाडी जि. भंडारा येथाल रेती घाटावरून अवैध रित्या रेती आणल्याची** माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ५ ब्रास रेती किंमती २५,००० /— रूपये आणि २) हायवा ट्रक क्रमाक एम एच ४९ बी. झेड. २६३८

किंमती २५,००,०००/— रूपये असा एकुण **२५,२५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद वाहन चालक आणि मालक यांच्या विरूध्द पोस्टे मौदा येथे कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, बि एन एस. सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम व कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम,१९५७. कलम ३ सार्वजनीक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम,१९८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चालक आरोपीला अटक करण्यात आली आहे.**




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर